*श्रीगुरुमाई यांच्याद्वारे लिखित पुस्तक*

# अंतःशुद्धीचे सोपान

*यामधून एक अंश*

प्रत्येक प्राणी स्वभावाने स्वार्थी असतो. प्रत्येक माणूसही काही अंशी स्वार्थी असतो. तुम्ही असे म्हणू शकता की, स्वार्थी असणे हा मानवजातीचा स्वभावच आहे. तर, आधुनिक जगाने मनुष्याचा वेळ आणि त्याची शक्ती यांना सर्व निर्बंधांपासून, इतर प्रत्येक गोष्टीपासून आणि प्रत्येक व्यक्तीपासून मुक्त करण्याद्वारे त्याला त्याच्याच उपजत अशा करुणेच्या क्षमतेपासूनही तोडून विलग केले नाही का? करुणा हा अतिशय साधासुधा सद्गुण आहे; पण त्याचे परिणाम खूप दूरगामी आहेत.

जेव्हा तुम्हाला हे ठाऊक नसते, की करुणेची अनुभूती वास्तवात कशी असते, तेव्हा तुम्हाला कदाचित हेही समजू शकणार नाही, की तुम्ही तिची आकांक्षा का करावी. करुणा ही एक दिव्य ऊर्मी आहे जी कोणाचे तरी अज्ञान किंवा दुःख पाहून तुमच्या अंतरी उचंबळून येते; आणि माझ्या म्हणण्याचा अर्थ फक्त अशा व्यक्तीशी संबंधित नाही, जी शारीरिकरित्या आजारी आहे. एका महात्म्याच्या करुणेविषयी विचार करा. बाबा मुक्तानंदांची करुणा इतकी विशाल आणि शक्तिशाली होती, की त्यांच्या सान्निध्यात येताच, तुमचा स्वतःच्या हृदयात प्रवेश व्हायचा.

अशी करुणा इतके हेलावून टाकते, की तिच्यामुळे शिळादेखील प्रेमाने रडू लागतात, असे म्हटले जाते. ही केवळ अशी भावना नाही, जी वेळोवेळी उत्पन्न होते आणि ओसरते. जेव्हा तुम्ही लक्ष्यापर्यंत पोहोचता, जसे बाबा पोहोचले होते, तेव्हा तुम्ही स्वतः करुणेची मूर्ती बनून जाता. म्हणूनच तुम्ही जिथे कुठे जाता, तिथे सर्वांना माहीत असते, की त्यांना मदत मिळेल. त्यांना जेव्हा तुमची उपस्थिती जाणवते, तेव्हा त्यांना निश्चिंतता, मोठी सुरक्षिततादेखील जाणवते. असे नसते, की तुम्ही एखाद-दुसरी महान कामगिरी करणार आहात. फक्त तुमची उपस्थितीच पुरेशी असते, कारण तुम्ही हृदयाची मृदुलता धारण केलेली आहे, एक प्रेमपूर्ण हृदय धारण केले आहे.

ही परम करुणा सगळ्यांमध्ये वास करते. म्हणूनच, सारे महात्मा म्हणतात : तुमच्या हृदयाच्या साम्राज्यात या. तुमच्या स्वतःच्या हृदयाच्या प्रभेमध्ये स्नान करा. तुमच्याच हृदयाच्या स्रोतामधून करुणेच्या अमृताचे पान करा. इतर कुठल्या ठिकाणी करुणा शोधू नका किंवा इतर कोणाकडून तिची अपेक्षा करू नका. ती तुमच्या अंतरी आहे. तुम्ही या महान सद्‌गुणाचे स्वामी आहात.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्‌गुणांचा योग,* अध्याय ७ ‘करुणा,’ यामधून उद्धृत [चित्‌शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. १०९-११०.